**ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत घरगुती नळ जोडण्या देण्याची कार्यपध्दती विहीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-२००१/ प्रक्र-३५७/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ सप्टेंबर २००१**

**पहा :-** १) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु-१०९८/ प्र.क्र.२११/ पापु-०७. दिनांक १४ डिसेंबर १९९८.
२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु- १०९९/ प्र.क्र. ३२८/ पापु-०७. दिनांक २७ जुलै २०००.

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमासाठी श्वेतपत्रिका प्रसिध्द केल्यानंतर, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले होते. त्यामध्ये दरडोई पाणीपुरवठयाचे प्रमाण ४० **लिटर्सवरुन ५५ लिटर्सपर्यंत वाढवून ३०% घरांना खाजगी नळजोडण्या** देण्याची तरतूद करण्यात आली होती. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात संदर्भीय क्रं.१ येथील दिनांक १४ डिसेंबर १९९८ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वयन यंत्रणांना देण्यात आलेल्या सविस्तर सूचनांमध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, खाजगी नळ जोडण्यांचे प्रमाण ३०% पेक्षा अधिक वाढल्यास, अन्य कुटुंबांना विहीत प्रमाणात पाणीपुरवठा होऊ शकणार नाही, या बाबींचा विचार करुन ग्रामपंचायतीने खाजगी नळ जोडण्या मंजूर करण्याचे बंधन पाळावे.

२. वरीलप्रमाणे आदेश असतानाही ग्रामपंचायती स्त्रोतातून उपलब्ध होणा-या पाण्याचा विचार न करता खाजगी नळ जोडण्या मंजूर करतात व त्यामुळे अन्य कुटुंबांना विहीत प्रमाणात पाणी उपलब्ध होत नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ज्या ग्रामपंचायती उपलब्ध पाण्याचा विचार न करता प्रमाणापेक्षा अधिक खाजगी नळजोडण्या देतील व त्यामुळे त्या योजनेतील अन्य कुटुंबांना योग्य प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसेल तर त्या ग्रामपंचायतीस व पर्यायाने ग्रामसेवकास जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. तसेच संदर्भीय क्रं.२ येथील दिनांक २७ जुलै २००० च्या शासन निर्णयान्वये, राज्य शासनाने केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना संपूर्ण राज्यासाठी लागू केल्या आहेत. त्यानुसार **दरडोई पाणी पुरवठयाचे प्रमाण ४० लिटर्स** असे करण्यात आले आहे. त्यामध्ये खाजगी नळ जोडण्या देण्याची तरतूद नाही. तथापि एखाद्या



८२८

गावास स्त्रोतातून होणा-या पाण्याची उपलब्धता अधिक असेल व त्यातून खाजगी नळ जोडण्या देणे शक्य असेल तर त्या देण्याबाबतचेही धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा सर्वसाकल्याने विचार करुन **शासन पुढीलप्रमाणे सूचना देत आहे :-**

१) संदर्भीय क्रं. २ येथील **दिनांक २७ जुलै २०००** च्या शासन निर्णयानुसार सुधारित धोरणात दरडोई पाणीपुरवठयाचे प्रमाण ४० लिटर्स दरडोई दर दिवशी असे असल्याने या निकषाप्रमाणे **फक्त सार्वजनिक नळ कोंडाळयांची तरतूद योजनेत करावयाची आहे.** तथापि एखाद्या गावच्या योजनेच्या स्त्रोतातून अधिक पाणी उपलब्ध होऊ शकत असेल तर, त्या योजनेतून **सामुहिक नळ जोडण्या व खाजगी नळ जोडण्या** संबंधित ग्रामपंचायतीस ग्रामसभेच्या मान्यतेनंतर देता येतील.

२) सुधारित धोरणानुसार नळ कोडाळी मंजूर करतांना **साधारणत: २५० व्यक्तींसाठी एक नळ कोंडाळे** मंजूर करण्यात यावे. एखाद्या वाडीत/ वस्तीत अथवा मागासवर्गीय/ आदिवासींच्या वस्तीत जर २५० पेक्षा कमी व्यक्ती असतील व तेथे नळ कोंडाळे देणे अत्यंत आवश्यक असेल तर अशा अपवादात्मक परिस्थितीत २५० पेक्षा कमी व्यक्तींसाठी नळ कोंडाळी मंजूर करता येतील.

३) प्रत्येक ग्रामपंचायतीने त्यांच्या गावासाठी नळ पाणी पुरवठा योजनेतून किती पाणी उपलब्ध होऊ शकेल याचा अंदाज जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांकडून अथवा जिल्हा परिषदेतील भूवैज्ञानिकांकडून असा सल्ला ग्रामपंचायतीने मागतिल्यास तो **३० दिवसांच्या आत देण्याचे बंधन** संबंधित अधिका-यावर राहील.

४) जर एखाद्या गावच्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या स्त्रोतातून दरडोई ४० लिटर्सपेक्षा अधिक पाणी वर्षाच्या बारमाही कालावधीत सातत्याने उपलब्ध होऊ शकत असेल तर, असे अधिकचे उपलब्ध होणारे पाणी किती आहे, ते सतत उपलब्ध होईल का? इत्यादी बाबीचा विचार करुन अतिरिक्त उपलब्ध होणार पाणी **खाजगी (घरगुती) / सामूहिक (दोन किंवा दोनपेक्षा अधिक कुटुंबांसाठी)** नळ जोडणीसाठी वापरावयाचे अथवा दरडोई दर दिवशी ५५ लिटरप्रमाणे हे जास्तचे पाणी सर्वांना उपलबध करुन द्यावयाचे याचा सर्वस्वी **निर्णय ग्रामसभेने घ्यावयाचा** आहे. तथापि ४० लिटर्स दरडोई दर दिवशी **या पेक्षा अधिकच्या** वापरावयाच्या पाण्यासाठीचा जो **अतिरिक्त भांडवली** खर्च योजनेमध्ये लागणार आहे तो संपूर्ण १००% खर्च संबंधित लाभार्थ्यांनी सोसावयाचा आहे.

५) जर वरील प्रमाणे उपलब्ध होणा-या पाण्याचा विचार करुन सामूहिक नळ जोडण्या/ खाजगी नळ जोडण्या द्यायचा निर्णय ग्रामसभेने घेतल्यास अशा किती सामूहिक नळजोडण्या/ खाजगी नळ जोडण्या द्यायच्या याचाही निर्णय **ग्रामसभेने घ्यावा.**

६) अशा प्रकारे देण्यात येणा-या **सामूहिक/ खाजगी (घरगुती) नळ जोडण्यासाठी** येणारा संपूर्ण भांडवली **खर्च** संबंधीत लाभार्थी **कुटुंबांकडून वसूल करण्यात यावा.** (यामध्ये योजनेच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गावातील सर्वात जवळच्या पाईपलाईनपासूनच्या ते संबंधीत लाभार्थी समूहापर्यंतचा/ लाभार्थी कुटुंबाच्या घरापर्यंतच्या पाईपलाईनचा व ती टाकण्याचा संपूर्ण खर्च अंतर्भूत असेल)

७) अशा प्रकारे सामुहिक व खाजगी नळ जोडणीसाठी प्राप्त झालेल्या मागणीपैकी **प्रथमतः सामुहिक नळ जोडणीस ग्रामसभेने प्राधान्य द्यावे** व सामुहिक नळ जोडण्या देऊनही अधिकचे पाणी उपलब्ध होणार असेल तर **खाजगी नळ जोडणी** देण्यासाठी विचार करावा.

८) खाजगी नळ जोडणीसाठी गावातून आलेली मागणी ही ४० लिटर दरडोई दर दिवस अशी किमान बारमाही गरज भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या पाण्याची उपलब्धता निश्चित केल्यावरही आणखी पाणी उपलब्ध होत असेल तर, उपलब्ध पाण्यातून खाजगी नळ जोडणीची मागणी करणा-या सर्व लाभार्थ्यांना खाजगी जोडण्या देणे शक्य नसेल तर अशा वेळेस त्या योजनेतून **किती खाजगी नळ जोडण्या द्यावयाच्या आहेत हे ग्रामसभेत आधी निश्चित करुन,** त्याचे वाटप लिलाव पध्दतीने ग्रामसभेने करावे. व जे लाभार्थी वरील ५ मध्ये नमूद केलेल्या खर्चा व्यतिरिक्त सर्वात जास्त रक्कम देण्यास तयार असतील अशा लाभार्थ्यांना त्याचे वाटप ग्रामसभेने करावे.

९) सामुहिक नळ जोडणीची सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या पाईपलाईन पासूनची (जेथून जोडणी देण्यात आली आहे तेथून पुढे) देखभाल व दुरुस्तीची संपूर्ण (१००%) जबाबदारी लाभार्थी समूह गटाची राहील. तर खाजगी नळ जोडणीच्या बाबतीत ती संबंधीत लाभार्थ्यांची राहील.

१०) वरील कार्यपध्दती यापुढे सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यान्वित होणा-या योजनांसाठी लागू राहील. संबंधित ग्रामपंचायतीने/ ग्रामसभेने योजनेची आखणी करतांना वरील सर्व बाबींचा विचार करुन जिल्हा परिषदेच्या अभियंत्यांच्या मदतीने योजनेचे अंदाज व आराखडे तयार करुन घ्यावेत. असे अंदाज व आराखडे तयार करतांना गावातील महिला मंडळ, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांची मतेही जाणून घ्यावीत व नंतर सदर अंदाज व आराखडे जिल्हा परिषदेकडे सादर करावेत.



४८३९

११)  ज्या गावांमध्ये यापूर्वीच योजना तयार होऊन सुरु झालेल्या आहेत व त्या गावात ३०% खाजगी नळ जोडण्या देण्याची तरतूद आहे व त्यासाठी पुरेसे पाणीही उपलब्ध आहे अशा गावात ३०% पेक्षा अधिक खाजगी नळ जोडण्या दिल्या जाणार नाहीत याची **जबाबदारी संबंधित गावच्या ग्रामसेवकांवर व सरपंचांवर निश्चित करण्यात यावी.**

१२)  जर एखाद्या गावाने ३०% पेक्षा अधिक खाजगी नळ जोडण्या दिल्याचे निदर्शनास आले व त्यामुळे गावातील इतर भागास/ इतर कुटुंबांना पुरेसा पाण्याचा पुरवठा होत नसेल तर संबंधित गावच्या **ग्रामसेवकास** जबाबदार धरुन त्याच्या विरुध्द **प्रशासकीय कार्यवाही** करण्यात यावी तसेच संबंधित अवैध जोडण्या देण्यास कारणीभूत असलेले **ग्रामसेवक, सरपंच व इतर संबंधित यांना** याबाबत संयुक्त जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र भूजल **अधिनियमातील कलम १६ नुसार कार्यवाही करावी.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सुधीर ठाकरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्य मंत्री यांचे सचिव
मा. उप मुख्य मंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकारण (सर्व)
जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकारण (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रााधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)



832

महालेखापाल, महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.



833